| | | |
|---|---|---|
| TM.Ai | **TickMark.Ai**<br>Mumbai | TM.Ai |
| **Class:** EM - CLASS 10 | **Subject:** Marathi | **Time:**3 hrs |
| **Date:** 21-02-2025 | **Paper:** PreBoard 2 (Solution) | **Marks:**80 |

**1(अ))**

**(1)** (1) (1) (i) मॅच संपल्यावर खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी उडणारी झिम्मड.

(ii) जेव्हा आंतरशालेय सामन्यात १०० धावा केल्या.

(2) लेखकाने आंतरशालेय सामन्यात १०० धावा केल्या , तेव्हा सर्वांच्या डोळ्यांतील कौतुकांचे भाव पाहून लेखकाची मान अभिमानाने वर झाली. लेखकाचे नाव मोठ्या अक्षरांत शाळेच्या बोर्डावर झळकले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. या कौतुकामुळे प्रथमच लेखकाला क्रिकेट खेळत असल्याबद्दल धन्य-धन्य वाटले.

(2) (i) लेखकाची वही गणिताच्या तासाला स्वाक्षरीने भरू लागली.

(ii) लेखकाला शिक्षकांनी प्रश्न विचारल्यास लेखकाचे उत्तर 'हाऊज दॅट?' असे असे.

(iii) लेखक झाडावर बसून मॅच पाहत बसे.

(iv) लेखकाने आंतर शालेय सामन्यात १०० धावा केल्या.

(3) लेखकास मुळातच खेळाची आवड होती. लेखक शिक्षणासाठी पुण्यात असताना वाय. एम. सी. ए. मध्ये त्यांची आवड जोपासली गेली. त्याच्या मनात क्रिकेटचे बीज पेरले गेले. त्याला तेथील खेळाडू सभासद आणि त्याचे वडील यांच्याकडून प्रोत्साहन मिळत गेले. मॅच संपल्यानंतर खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी लोकांची होणारी गर्दी पाहून लेखकाच्या मनात 'आपणही एक मोठे खेळाडू व्हावे. मग आपल्या भोवतीही अशीच स्वाक्षरीसाठी गर्दी होईल' असे येऊ लागले. तेव्हा पासून लेखकाची स्वाक्षरीच्या तालमीला सुरुवात झाली. पुढे लेखकाने आंतरशालेय सामन्यात १०० धावा केल्या , तेव्हा सर्वांच्या डोळ्यांतील कौतुकांचे भाव पाहून लेखकाची मान अभिमानाने वर झाली. लेखकाचे नाव मोठ्या अक्षरांत शाळेच्या बोर्डावर झळकले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. या कौतुकामुळे प्रथमच लेखकाला क्रिकेट खेळत असल्याबद्दल धन्य-धन्य वाटले. अशाप्रकारे लेखकाच्या मनात पेरले गेलेले क्रिकेटचे बीज उगवले.

TickMark.Ai

**(आ))**

**(1)** (1) (1) भांडी धुणे

(2) फरशी पुसणे

(2) (i) अभिषेक

(ii) रेखामावशीं

(iii) सुमित

(iv) स्नेहल

(3) हे वाक्य लोकांना सायकल चालवण्याचे फायदे समजून घेण्यासाठी आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात सायकलचा समावेश करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी आहे. सायकल चालवणे हे एक उत्तम व्यायाम आहे. हे हृदय आणि फुफ्फुसांना मजबूत करते, वजन कमी करते आणि तणाव कमी करते. सायकल चालवणे हे प्रदूषण कमी करते. हे हवा आणि पाण्याचे प्रदूषण कमी करते आणि हवामान बदलाशी लढण्यास मदत करते. सायकल चालवणे हे वाहतुकीची कोंडी कमी करते. हे रस्त्यांवरील वाहनांची संख्या कमी करते आणि लोकांना वेळेवर पोहोचण्यास मदत करते. आपण सर्वांनी या वाक्याचा अर्थ समजून घेऊन आणि आपल्या दैनंदिन जीवनात सायकलचा समावेश करून त्याचे पालन करणे आवश्यक आहे.

**(इ))**

**(1)** (1) (i) कुष्ठरोग्यांना स्वाभिमानाने जगायला शिकविले.

(ii) कुष्ठरोग्यांवर उपचार केले.

(iii) त्यांना निवास उपलब्ध करून दिला.

(iv) स्वत:च्या पायावर उभे राहण्यांसाठी साधने उपलब्ध करून दिली.

(2) (i) शरीरे, (ii) मने, (iii) भाकर, (iv) जीवने

**2(अ))**

**(1)** (1) (i) बाळ आगीच्या तडाख्यात सापडते तेव्हा.

(ii) आपली पिले धरणीवर कोसळताच

(iii) भुकेल्या वासराच्या आवाजाने.
(iv) जंगलात वणवा लागताच आपल्या पाडसाच्या काळजीने.

(2) (i) नामदेव महाराज
(ii) चातक
(iii) वासरू
(iv) परमेश्वर

(3) 'धार उडे आकाशी, चित्त तिचे पिलापाशी' या उक्तीप्रमाणे मानव, प्राणी किंवा पक्षी या प्रत्येकाचेच आपापल्या अपत्याच्या संरक्षणाकडे विशेषकरून लक्ष असते. चराचर सृष्टीतील ही वास्तविकता नामदेव महाराजांनी आपल्या अंकिला मी दास तुझा' या अभंगात वर्णन केली आहे. ममता किंवा मातृत्व ही कल्पना मानव व मानवेतर प्राणी या सर्वांमध्येच दिसून येते. स्त्री ही चाहाल्यांसाठी प्रसिद्ध आहे. कोणत्याही मातेचे बाळ अग्नीमध्ये म्हणजेच संकटांत सापडणे ही कल्पनासुद्धा ती सहन करू सकत नाही. अशी ही दयाळू आई खरोखरच जर बाळ 'अग्नीमध्ये' सापडले तर आगीत उडी ध्यायलासुद्धा तयार असते आणि अशीच ममता मानवेतर प्राण्यांमध्येसुद्धा दिसून येते. वासराच्या केवळ हंबरण्याच्या आवाजाने गाय वासराजवळ जाऊन त्याची भूक भागविते याप्रमाणेच पक्षिणीसुद्धा तिचे मातृप्रेम दाखवून देते. पिळू जमिनीवर पडताक्षणीच पक्षिणी त्याच्याकडे झेपावते या वरून मातृप्रेमाची भावना / मानव व मानवेतर प्राणी सर्वांकडे सारखीच असल्याचे दिसून येते.

(4) "तैसा धांवें माझिया काजा। अंकिला मी दास तुझा॥" ही काव्यपंक्ती नामदेव महाराजांनी लिहिलेल्या 'अंकिला मी दास तुझा या अभंगातील असून यात परमेश्वराचे आपल्याकडे लक्ष वेधून घेण्यासाठी नामदेव महाराज मनापासून प्रार्थना करतात. आगीत सापडलेल्या बालकाची स्वतःमध्ये भूमिका स्वतःमध्ये पाहत ते परमेश्वराला म्हणतात की संकटात सापडलेल्या बालकाकडे म्हणजे भक्ताकडे धावत येतो हे तुझे कर्तव्य आहे कारण मी तुझा अंगीकारलेला दास आहे आणि हे परमेश्वरा तू माझा स्वामी आहेस, माझे संकट हे तुझे संकट आहे असे समजून मायेच्या ममतेने तू या बालकाकडे नक्कीच धावत येशील.'

**(आ))**

**(1)** १. प्रस्तुत कवितेचे कवि/कवयित्री : संत एकनाथ महाराज
२. प्रस्तुत कवितेचा विषय : संत एकनाथ महाराजांचा हा अभंग योगी पुरुषाचे महत्त्व सांगणारा आहे.
३. तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।
'योगी सर्वकाळ सुखदाता' या एकनाथी भागवतातील संत एकनाथांची रचना योगीपुरूषाची लक्षणे विषद करते. यात योगीपुरुष आणि पाणी यांची तुलना केली असून योगीपुरूषाचे गुण हे पाण्याच्या गुणापेक्षा श्रेष्ठ आहेत हे विविध उदाहरणांद्वारे संत एकनाथ पटवून देतात. आकाशातील मेघामधून पृथ्वीवर पाऊस पडतो तेव्हा शेती पिकते. धनधान्याची उपज होते. नद्यानाले भरून वाहतात. सर्वांचे पालनपोषण होते. तसेच योगीपुरुषांनी पृथ्वीतलावर येण्याने, त्यांच्या श्रवणकीर्तनाने सर्वसामान्य जनांना आत्मज्ञानाची प्राप्ती होते. योगीपुरुषांचे विचार, त्यांचे ज्ञान प्रेरणादायी असतात. त्यांच्या मार्गदर्शनाने व्यक्तीमधील नकारात्मकता दूर होऊन सकारात्मक वृत्तीस चालना मिळते. ज्यायोगे सन्मार्ग सापडतो. आयुष्याची वाटचाल सुकर होते. त्यांची आध्यात्मिक उन्नती होते. उद्धार होतो असा आशय वरील पंक्तीमधून व्यक्त होतो.
४. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश : योगी पुरुष आणि पाण्याची तुलना केली असून, योगी पुरुष हा पाण्यापेक्षा ही श्रेष्ठ आहे, हे विविध दृष्टान्तांतून संत एकनाथ यांनी स्पष्ट केले आहे.
५. प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण - योगी सर्वकाळ सुखदाता' या अभंगात संत एकनाथांनी पाणी व योगी पुरुष हा पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे, हे अनेक दृष्टान्तातून स्पष्ट केले आहे. या अभंगात काही फार छान दृष्टांत मांडले आहेत जसे पाणी फक्त लौकिक पोटाची भूक शमवते; पण योगी पुरुषाचे आत्मज्ञान लोकांचे मानस उजळवते, हा सूचित अर्थ ओघवत्या शब्दकळेत संत एकनाथ महाराजांनी साधला आहे. अशा या पाणी व योगी पुरुष यांच्या तुलनेतून लौकिक व अलौकिकाची सांगड घालणारा अभंग मला खूप आवडला.

**(2)** १) संत नामदेव.
२) परमेश्वर कृपेची याचना.
३) हा अभंग खूप आवडला आहे. संत नामदेवांनी विविध दृष्टान्तांतून परमेश्वर कृपेची याचना केली आहे. माता - बाळ, पक्षीण - पिल्लू, धेनू - वासरू, मेघ - चातक, हरीण - पाडस या उदाहरणाच्या माध्यमातून परमेश्वराला आईप्रमाणे स्वत:चा सांभाळ करावयास संत नामदेव सांगत आहेत. हा अभंग काळजाला भिडतो. आईचे प्रेम व बाळाचे रक्षण या भावनेमुळे हा अभंग फार आवडतो.
४) संत नामदेवांनी विठ्ठलाला माऊली म्हटले आहे. आणि स्वत: तिचे बाळ आहोत हा आशय मांडतांना आईचे आपल्या बाळाप्रती प्रेम, बाळाला वेदना झाल्यामुळे आईची होणारी घालमेल आईशिवाय आपल्याला सांभाळणारे कोणी नाही हा संदेश या कवितेत व्यक्त होत आहे.
५) परमेश्वर कृपेची ओढ व्यक्त करताना संत नामदेव उदाहरण देतात की अग्निमध्ये सापडलेल्या आपल्या बाळाला वाचवायला एक प्रेमळ आई जशी धावून येते त्याचप्रमाणे संत नामदेव परमेश्वराच्या भेटीसाठी आतुर झाले आहेत. आपल्या मनीची ओढ व्यक्त करताना ते म्हणतात, मी तुझा दास आहे. मला सुद्धा श्री विठ्ठला आईसारखा येऊन संसाराच्या अग्नीमधून सुखरूप बाहेर काढा.

**3)**

**(1)** डॉ. होमी भाभा - डॉ. होमी भाभा हे प्रचंड स्फूर्तिदायक व्यक्तिमत्त्व होते. डॉ. होमी भाभा संस्थेत काम करायला आलेल्या मुलांना म्हणत, सर्वजण संशोधन करत रहा, त्यासाठी सरकारला खर्च किती येतो याचा विचार करू नका, तुम्ही स्वतःच काम निर्माण करा. आपण काय काम करायचं हे स्वतःच ठरवा बॉसने सांगितलं तेवढंच काम करायचं आणि सांगितलं नसेल तर आपल्याला कामचं नाही अस समजायचं, हे चूक आहे ही प्रवृत्ती गेली पाहिजे. स्वतःला सक्षम करण्याचे पाठ मुलांना देत असत.

**(2)** सूर्य अस्ताला जाऊ लागला कि कविमन कविता करू लागते. चित्रकार समोर दिसणारे निसर्गसौदर्य त्याच्या कुंचल्याने रंगवू लागतो. सूर्यास्ताच्या



TickMark.Ai

वेळी आकाशात मनोहारी रंगांची मुक्त उधळण असते.
सूर्योदय – सूर्यास्त जणू माणसाच्या जन्म आणि मृत्यूचे प्रतिक आहेत. सूर्योदय म्हणजे माणसाचा जन्म, पाहत व सकाळ म्हणजे बालपण आणि तारुण्य, दुपार म्हणजे मध्यमवय तर संध्याकाळ म्हणजे जणू वार्धक्य होय. दिवस संपल्यानंतर सूर्यास्ताची वेळ मनाला शांती व समाधान देते. दिवसभर कष्ट करणाऱ्यासाठी सूर्यास्त हि विश्रांतीची वेळ असते. तसेच संपूर्ण आयुष्य सुयोग्य मार्गाने व्यतीत केल्यास आयुष्याची संध्याकाळ, सूर्यास्ताची वेळ ही शांत, समाधानकारक आणि सुखकर असते. सुर्यास्त हा केवळ आजच्या दिवसाचा अंत नसतो. या शेवटा मध्ये उद्याच्या नव्या दिवसाची चाहूल असते. गेलेला दिवस भूतकाळ असतो तर येणारा दिवस उज्ज्वल भविष्यकाळ घेऊन येत असतो. सूर्यास्ताच्या वेळी काही चेहऱ्यावर काम पूर्ण केलेल्याचे समाधान असते तर काही चेहऱ्यांवर अपूर्ण काम पूर्ण करण्याचे दुर्दम्य इच्छाशक्ती असते.
सूर्यास्ताला तिन्हीसांजेची वेळ असेही म्हणतात. पाखरांचे घरट्यात परतणे, समस्त प्राणिमात्रांची, माणसांची आपापल्या घरी परतण्याची ओढ, देवळातील घंटानाद, श्लोक आरतीचे सूर यामुळे प्रेम, आपुलकी आणि श्रद्धेचे वातावरण निर्माण होते.
असा हा सूर्यास्त सृष्टीला प्रसन्न करतो, मनाला शांत करतो. लहान मोठे, स्त्री पुरुष, गरीब श्रीमंत, जाती धर्म... साऱ्या भेदभावाच्या भिंती गळून पडतात आणि सृष्टीतील प्रत्येक घटक सूर्यास्ताच्या मनोहारी रंगपंचमीत न्हाऊन निघतो.

**(3)** पाणी हे पृथ्वीवरील अमृत आहे. पाणी हे पृथ्वीवरील प्रत्येक घटकाला आवश्यक असते. पाण्याशिवाय आयुष्य जगणे शक्य नाही. सृष्टीला जीवंत ठेवण्याची सामर्थ्य फक्त पाण्यातच आहे. पाणी नसल्याने संपूर्ण धरती मरूभूमीचे रूप धारण करते म्हणून पाणी आवश्यक आहे.

**4(अ))**

**(1))**
**(1)** प्रश्नार्थी वाक्य
**(2)** उद्गारार्थी वाक्य

**(2))**
**(1)** सर्वांनी रांगेत उभे रहा.
**(2)** मला हे चित्र पसंत आहे.

**(3))**
**(1)** वाव नसणे - थारा नसणे, सोय नसणे
वाक्य - रस्त्यात एवढे पाणी भरले होते कि पुढे जाण्यास काही वाव नव्हता.
**(2)** गलका करणे - गोंगाट करणे
वाक्य - परीक्षेचा निकाल सांगण्यासाठी शिक्षक वर्गात येताच मुलांनी गलका केला.
**(3)** कष्टी होणे - खिन्न होणे, दुःखी होणे
वाक्य - काकांची अवस्था पाहून कविता कष्टी झाली.

TickMark.Ai

**(आ))**

**(1))**

**(1))**
**(1)** (i) अंगण - आवार
(ii) अंगार - निखारा

**(2))**
**(1)** (i) खंडन x मंडन
(ii) खात्री x शंका

**(3))**
**(1)** (i) पुरस्कार - पुरस्कार
(ii) गाव - गावे

**(4))**
**(1)** खूप वय असणारा - वयस्कर

**(2))**
**(1)** तत्त्वता
**(2)** निसर्ग हा मोठा जादूगार आहे.

**(3))**
**(1)** "आता ह्या उड्या मारायला मी लाजदेखील सोडली हे पाहता ना तुम्ही, बाबा ?"
**(2)** ! – उद्गारवाचक चिन्ह
'.........' एकेरी अवतरण चिन्ह

**5(अ))**

**(1))**
**(1)**

**(2))**

**(आ))**

**(1))**
**(1)** (1) रु.200/-
(2) 10 ते 15
(3) 25 डिसेंबर ते 27 डिसेंबर
(4) राष्ट्रीय उद्यानातील
(5) जंगल भ्रमंती संस्था

**(2))**
**(1)**

**(3))**
**(1)**

**(इ))**

**(1))**
**(1)** शालेय प्रजासत्ताक दिन

TickMark.Ai

२६ जानेवारी म्हणजे प्रजासत्ताक दिन माझ्या शाळेत प्रजासत्ताक दिनानिमीत्ताने ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ध्वजारोहनाच्या कार्यक्रमाची वेळ ही सकाळी सात वाजत होती, म्हणून मी आधल्या दिवशीच माझ्या शाळेचा ड्रेस स्वच्छ धुवून इस्त्री केला.व सकाळी लवकर उठून आंघोळ करून शाळेत गेलो,तर बघतय तर काय शाळेत सर्वत्र देशभक्तिच वातावरण होत. सर्वत्र देशभक्तिवर गीत सुरू होते.

ध्वजारोहनाच्या कार्यक्रमाचे स्थळ म्हणजे माझ्या शाळेचे मैदान. संपूर्ण शाळेचे मैदान हे अगोदरल्या दिवशी नीट स्वच्छ करून त्यावर रांगेत उभे राहण्याकरिता सरळ रेषा पांढऱ्या चुन्याने आखून घेतल्या होत्या. आणि वर तोरणे लावण्यात आली होती. सर्वत्र उत्सवाच वातावरण होत. मग पटापट शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांच्या सरळ रेषेत रांगा लावल्या. आणि कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आले. त्यानंतर ध्वजारोहन करण्यात आले.सर्वांनी राष्ट्रीय झेंडा तिरंगा याला सलामी दिली,आणि मग राष्ट्रीय गीत व प्रतिज्ञा झाली. नंतर विधार्थ्यांनी तयार केलेली देशभक्तिवर गीत म्हणण्यात आले. आणि मग प्रमुख पाहुणे आणि शाळेचे मुख्याध्यापक यांची भाषणे झाली.

प्रजासत्ताक दिनानिमीत्त शाळेमध्ये विविध सांसस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये देशभक्तिवर नाटक, नृत्य आणि भाषण होते. मी पण सांसस्कृतिक कार्यक्रमामध्ये भाषण दिले.आणि नाटक पण सादर केले त्यामध्ये माझे खूप कौतुक झाले.प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमासाठी सर्वांनी आपले योगदान दिले व सहभाग दिले.त्यानंतर आभार प्रदर्शन करण्यात आले आणि सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट देण्यात आले आणि प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. अशा प्रकारे माझ्या शाळेतील प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम झाला.

तर हे होत शाळेतील प्रजासत्ताक दिन प्रसंगलेखन मराठीमध्ये तुम्हाला प्रसंग लेखन कस वाटल तर काही टिप्पणी करून नक्की कळवा, आणि आपल्या सोशल मीडिया वर शेअर करा धन्यवाद. 'भेटूया पुढच्या लेखामध्ये'.

**(2))**
**(1)** **पुस्तकाचे आत्मवृत्त**

एकदा सकाळी उठण्यास फारच वेळ झाला. मन आळसावले होते. अभ्यासाचा खोलीत जाऊन नुसताच टेबला जवळील खुर्चीवर बसलो होतो. टेबलावर पुस्तके अस्ताविस्तपणे पडली होती. मी मनामध्ये कांही विचारकरीत होतो. तोच माझ्या कानांवर कांही शब्द पहले अरे नुसताच काय बसतोस या पुस्तकांच्याकडे बघता हल्ली बरीच पुस्तके तु हातात घेतोस आणि ठेवून देतोस. मलाही तसेच करतोस. आमचा तुला कंटाळा आला आहे काय? या शब्दानी मी भानावर आलो. पाहतो तर इतिहासचे पुस्तक माझ्याशी चक्क बोलत होते. ते सांगत होते कि माझा जन्म एका नामवंत इतिहास संशोधकांच्या घरी झाला. त्यामुळे माझी किंमत वाढलेली होती. त्यामुळे मला खूप मागणी होती. मी अनेकांच्या घरी होते. माझी ज्ञानी माणसांबरोबर मैत्री झाली. मी सर्वांना खूप आवडत होते. माझा या सर्व लोकांना खूप उपयोग होत होता. त्यांच्या ज्ञानामध्ये खूप मोठी भर पडत होती माझ्यामध्ये खूप संशोधनाची माहिती असलेले सर्वजण माझा वारंवार उपयोग करून घेत होते. इतर पुस्तकापेक्षा मला जरा जास्त मान मिळत होता.

आता पुस्तकांचे स्वरूप बदलत चालले आहे. नवीन डिजीटल तंत्रज्ञानामुळे संगणकावरच बरीच पुस्तके उपलब्ध होतात. त्यामुळे पुस्तकांचा वापर कमी होत चालला आहे. हा वापर कमी झाल्यामुळे बरे वाटते कारण आम्हाला वाचण्यासाठी सारखे हातात घेवून घेवून

आम्हाला फाडून टाकले जाते. आमच्याकडे कोणी लक्षपण फारसे देत नाही. त्यामुळे आम्हाला आता थोडा आराम मिळतो. याचा आनंद आहे अरे पण हा आनंद जास्त काळ टिकणार नाही. कारण जर सर्व पुस्तके संगणकावर उपलब्ध झाली तर पुस्तकाला मागणी कमी होणार त्यांची छपाईकमी होणार. बाजारात पुस्तके मिळणार नाहीत. मग गरीबाती काय करावयाचे? त्यांना संगणक घेणे परवडणार नाही आणि ते चांगल्या ज्ञानापासून वंचित राहतील याची खंत वाटते. दारावरील टकटकीने मी भानावर आलारे. दारात आई चहाचा कप घेवून उभी होती. मी चहा घेवून पुस्तकाचा विचार करत असता पुस्तकाचे म्हणणे बरोबर आहे. याचा आपण विचार केला पाहिजे असे वाटले.

**(3))**

**(1)** **पुस्तक: एक महान शिक्षक**

पुस्तक हे खरेतर उत्तम शिक्षक आहे. मानवाने ई-पुस्तकांपर्यंत प्रगती केली असली तरी छापील पुस्तकांचे महत्त्व कायम आहे. प्राचीन काळी दगड, माती, झाडांची पाने यांवर लेखन केले जात असे, तर मुद्रणकलेच्या शोधानंतर कागदावर पुस्तक तयार होऊ लागली. आज पुस्तके इलेक्ट्रॉनिक स्वरूपातही उपलब्ध आहेत, पण छापील पुस्तक वाचण्याची मजा काही वेगळीच आहे.

पुस्तक आपल्या जीवनाला ज्ञान देते, विचारांना दिशा देते, आणि मनोरंजनही करते. आपले दुःख हलके करते तर विनोदी भाग आपल्याला हसवतो. ग्रंथालयात पुस्तकं तुमच्यासाठी वाट पाहत असतात, पण हल्ली ती दुर्लक्षित राहतात. ई-पुस्तकांमुळे ग्रंथालयं ओस पडत आहेत, परंतु छापील पुस्तक हातात धरून वाचण्याचा आनंद काही औरच असतो.

महान नेते आणि विचारवंत जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, साने गुरुजी यांच्यासाठी पुस्तक हे प्रेरणास्थान होते. त्यांनी पुस्तकांमुळेच ज्ञान मिळवून देशाच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलला. म्हणून, "पुस्तक वाचा, ज्ञान वेचा" हा मंत्र लक्षात ठेवून आपणही पुस्तकांशी मैत्री करायला हवी. ती आपले जीवन नक्कीच सुवर्णमय करतील.

All the Best

TickMark.Ai